प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

बेस्ट

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

प्रसिध्दी पत्रक क्र. २०
दिनांक : ०७.०३.२०२५

( सुदास सावंत )
जनसंपर्क अधिकारी

---

## ५ वा हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार २०२५

"बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट अंडरटेकिंग )" ही कंपनी "ऊर्जा संक्रमण - मार्ग प्रकाश विद्युतीकरण मधील शहरी स्थानिक संस्था उत्कृष्टता पुरस्कार" या श्रेणी अंतर्गत **"५ व्या हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार २०२५"** चे विजेता घोषित करण्यात आले आहे. श्री. अनिल राजदान, माजी ऊर्जा सचिव, भारत सरकार आणि श्री. अनिलकुमार जैन - अध्यक्ष, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळ (पीएनजीआरबी) यांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी दिल्लीतील डिझायर हॉल, ले मेरिडियन येथे झालेल्या १३ व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेच्या निमित्ताने अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत बेस्ट उपक्रमाच्या विद्युत पुरवठा विभागाचे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. बिलाल शेख आणि मुख्य अभियंता (नियोजन) श्री. सुरेश मकवाना यांनी चषक आणि प्रमाणपत्र स्विकारले.

पुरस्कार समारंभ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सने आयोजित केला होता. बेस्ट उपक्रमाचे कार्यक्षम नेतृत्व आणि वीज क्षेत्रातील स्वच्छ उर्जा आणि शाश्वत पध्दतीला प्रोत्साहान देण्यासाठी अढळ वचनबध्दता मोठ्या प्रमाणात ओळखली गेली आहे व त्याचे कौतुक केले गेले आहे.

.....